नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ थे | Year - 4rd | अंक - १२६ | Issue - 126 | वार - गुरुवार दि. १ ऑक्टोबर २०२६ | Blow- Thursday Date 1 OCTOBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## टीम इंडियाचा आतापर्यंतचा सर्वात मोठा विजय, शुभमन गिलचे तुफानी द्विशतक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : भारतीय क्रिकेट संघाचा युवा कर्णधार शुभमन गिलने वेस्ट इंडिजविरुद्धच्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात जागतिक क्रिकेटच्या इतिहासाला गवसणी घातली. वेस्ट इंडिजने दिलेल्या ४०६ धावांच्या विशाल आव्हानाचा पाठलाग करताना गिलने अवघ्या ११७ चेंडूंमध्ये आपले द्विशतक पूर्ण केले. १३३ चेंडूत २२३ धावांची वादळी खेळी करताना त्याने २६ चौकार आणि ०८ गगनचुंबी षटकार लगावले. त्यासोबतच भारतीय संघाने इतिहासातील धावांचा पाठलाग करताना सर्वात मोठ्या विजयाची नोंद केली आहे. भारताने या सामन्यात ८ विकेटने विजय मिळवत मालिका २-० ने खिशात घातली. या ऐतिहासिक खेळीसह शुभमन गिलने इशान किशनचा १२६ चेंडूत द्विशतकाचा विक्रम मोडीत काढत जगातील सर्वात वेगवान द्विशतकवीर बनण्याचा मान मिळवला आहे. गिलचे हे एकदिवसीय कारकिर्दीतील दुसरे द्विशतक असून, हा पराक्रम करणारा तो रोहित शर्मानंतरचा केवळ दुसरा भारतीय फलंदाज ठरला आहे. त्याच्या या खेळीमुळे भारताने वेस्ट इंडिजविरुद्धचा सामना सहज जिंकला. याआधी सचिन तेंडुलकर, वीरेंद्र सेहवाग यांनाही शुभमन मागे टाकले असून जगातील पहिला फलंदाज ठरलाय.

वेस्ट इंडिज संघाने पहिल्यांदा फलंदाजी करताना ५० ओव्हरमध्ये ४०५-७ धावा केल्या होत्या. यामध्ये सलामीवीर जॉन कॅम्पबेलने अवघ्या ६५ चेंडूत १०१ धावांची स्फोटक खेळी केली. त्यानंतर कर्णधार शाय होप याने ९४ चेंडूंत ८ चौकार आणि ३ षटकारांसह १०४ धावांची संयमी आणि तितकीच आक्रमक खेळी केली. अखेरीस अमीर जांगू याने वादळी फलंदाजी करत अवघ्या ७० चेंडूंमध्ये नाबाद ११४ धावा कुटल्या आणि वेस्ट इंडिजला पहिल्यांदाच ४०० धावांचा टप्पा करून दिला होता. या डोंगराएवढ्या आव्हानाचा पाठलाग करताना भारतीय फलंदाजांची परीक्षा होती. मात्र शुभमन गिलची विक्रमी द्विशतकी आणि रोहित शर्माच्या शतकी खेळीच्या जोरावर भारताने ओव्हरमध्ये सामना जिंकवला.

रोहित शर्माने वेस्ट इंडिजच्या गोलंदाजांवर सुरुवातीपासूनच प्रहार करत अवघ्या ७५ चेंडूंत १० चौकार आणि ६ षटकारांच्या मदतीने १०१ धावांची झंझावाती शतकी खेळी केली होती. रोहितने दुसऱ्या टोकाला असलेल्या शुभमन गिलसोबत पहिल्या विकेटसाठी २५५ धावांची ऐतिहासिक सलामी दिली, जी वनडे क्रिकेटच्या इतिहासात वेस्ट इंडिजविरुद्ध कोणत्याही विकेटसाठी झालेली सर्वोच्च भागीदारी ठरली. रोहित बाद झाल्यानंतर मैदानावर आलेल्या विराट कोहलीने १९ चेंडूंत २९ धावा (३ चौकार, १ षटकार) करून आऊट झाला. या संपूर्ण डावाचा खरा महानायक शुभमन गिल ठरला, ज्याने मैदानावर चौफेर फटकेबाजी करत अवघ्या १२५ चेंडूंत २५ चौकार आणि ८ गगनचुंबी षटकारांसह नाबाद २२३ धावांचे महाद्विशतक ठोकले. ऋतुराज गायकवाड ३१ धावांवर नाबाद राहिला.

या सामन्यामध्ये रोहित शर्मानेही १०१ धावांची खेळी करताना आपले ३५वे शतक पूर्ण केले. त्यासोबतच एकाच देशात २०० षटकार मारण्याचा विक्रमही त्याने नावावर केला आहे. रोहितने १२,००० धावांचा टप्पा पूर्ण करताना वनडे क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावांच्या यादीत तो तिसऱ्या स्थानी पोहोचला आहे. पहिल्या सामन्यात मोठी खेळी करण्यात अपयशी ठरलेल्या रोहितने आज शतकी खेळी करत आपली ताकद दाखवून दिली.

## केंद्राचा निर्णय; रब्बी पिकांच्या किमान आधारभूत किंमतीमध्ये मोठी वाढ

### केंद्रीय मंत्रिमंडळाच्या आर्थिक व्यवहार विषयक समितीच्या बैठकीत या दरवाढीस अधिकृत मंजुरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली : देशातील शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालाला अधिक लाभदायक भाव मिळावा आणि रब्बी हंगामातील पिकांच्या उत्पादनाला प्रोत्साहन लाभावे, या उद्देशाने केंद्र सरकारने विपणन हंगाम २०२७-२८ साठी सर्व अधिदेशित रब्बी पिकांच्या किमान आधारभूत किमतीत मोठी वाढ करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या आर्थिक व्यवहार विषयक समितीच्या बैठकीत या दरवाढीस अधिकृत मंजुरी देण्यात आली आहे.

विविध पिकांच्या एमएसपीमधील वाढ आणि नवीन दर

सरकारने घेतलेल्या या निर्णयामुळे शेतकऱ्यांना विविध पिकांवर भरघोस वाढीव दर मिळणार आहेत. सर्वाधिक वाढ करडईच्या (कुसुमला) एमएसपीमध्ये ६७५ रुपये प्रति क्विंटल करण्यात आली असून, त्यानंतर रॅपसीड व मोहरीच्या एमएसपीमध्ये ४१३ रुपये प्रति क्विंटलची वाढ झाली आहे. याशिवाय मसूरच्या एमएसपीत ३९० रुपये, जवळील ज्वारीच्या एमएसपीत १३६ रुपये, हरभऱ्याच्या एमएसपीत ८३ रुपये आणि गव्हाच्या एमएसपीमध्ये २५ रुपये प्रति क्विंटलची वाढ जाहीर करण्यात आली आहे.

या सुधारित दरवाढीनुसार, विपणन हंगाम २०२७-२८ साठी विविध रब्बी पिकांचे नवीन एमएसपी दर खालीलप्रमाणे असतील:

गहू: २,६१० रुपये प्रति क्विंटल
ज्वारी: २,२८६ रुपये प्रति क्विंटल
हरभरा: ५,९५८ रुपये प्रति क्विंटल
मसूर: ७,३९० रुपये प्रति क्विंटल
रॅपसीड व मोहरी: ६,६१३ रुपये प्रति क्विंटल
करडई (कुसुमला): ७,२१५ रुपये प्रति क्विंटल

उत्पादन खर्चाच्या तुलनेत दीडपट नफा आणि पीक विविधीकरण

केंद्र सरकारने २०१८-१९ च्या केंद्रीय अर्थसंकल्पातील घोषणेनुसार, एमएसपी हा अखिल भारतीय भारित सरासरी उत्पादन खर्चाच्या किमान दीडपट (५० टक्के नफा) ठेवण्याचे आपले धोरण या वेळीही कायम ठेवले आहे. नव्या हंगामातील एमएसपीनुसार उत्पादन खर्चाच्या तुलनेत गव्हासाठी तब्बल १०६ टक्के, रेपसीड व मोहरीसाठी ९६ टक्के, मसूरसाठी ९२ टक्के, हरभऱ्यासाठी ५९ टक्के, जौसाठी ५८ टक्के आणि करडईसाठी ५० टक्के मार्जिन (नफा) शेतकऱ्यांना मिळणे अपेक्षित आहे. (ठरलळ चड्झ २०२६)

सध्या देशात अन्नधान्याबरोबरच डाळी आणि तेलबियांचे देशांतर्गत उत्पादन वाढवणे ही काळाची गरज बनली आहे. त्यामुळे सरकारकडून या पिकांना तुलनेने उच्च एमएसपी देण्यावर विशेष भर दिला जात आहे. या नव्या आणि आकर्षक दरवाढीमुळे शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य मिळण्यासोबतच पारंपरिक पिकांच्या पलीकडे जाऊन पीक विविधीकरणाला मोठ्या प्रमाणावर चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

सरकारी खरेदी आणि शेतकरी खात्यात जमा झालेली रक्कम

सरकारी आकडेवारीनुसार, मागील काही वर्षांत अन्नधान्य व रब्बी पिकांच्या खरेदीमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. २०१४-१५ ते २०२५-२६ या कालावधीत गव्हाची एकूण सरकारी खरेदी ३,७१५ लाख मेट्रिक टन झाली आहे, जी यापूर्वीच्या २००४-०५ ते २०१३-१४ या कालावधीत २,२५४ लाख मेट्रिक टन इतकी होती. याचप्रमाणे, सहा प्रमुख रब्बी पिकांची सरकारी खरेदी २०१४-१५ ते २०२५-२६ दरम्यान वाढून ३,९२१ लाख मेट्रिक टनवर पोहोचली आहे, जी मागील दशकात (२००४-०५ ते २०१३-१४) २,३०२ लाख मेट्रिक टन होती.

आर्थिक लाभाच्या बाबतीत बोलायचे तर, २०१४-१५ ते २०२५-२६ या कालावधीत केवळ गहू उत्पादक शेतकऱ्यांना एमएसपीपोटी तब्बल ७.३१ लाख कोटी रुपये अदा करण्यात आले आहेत. २००४-०५ ते २०१३-१४ या कालावधीत ही रक्कम केवळ २.५६ लाख कोटी रुपये होती. तसेच, सहा प्रमुख रब्बी पिकांच्या उत्पादक शेतकऱ्यांना २०१४-१५ ते २०२५-२६ या कालावधीत एमएसपीपोटी एकूण ८.३६ लाख कोटी रुपये थेट देण्यात आले असून, त्याआधीच्या काळात ही रक्कम २.६५ लाख कोटी रुपये होती. यावरून सरकारचा भर शेतकरी कल्याणाकडे अधिक असल्याचे स्पष्ट होते.

## फटाक्यांवर पूर्णपणे बंदी लावता येणार नाही!; दिवाळीपूर्वी सर्वोच्च न्यायालयाचा महत्वाचा निकाल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली: दिवाळी म्हटलं की फटाके. फटाक्यांचा कुतूहल आणि आनंद मुलांमध्ये जास्त असतो. मात्र या फटाक्यांमुळे ध्वनी प्रदूषण, वायू प्रदूषण, आजार देखील होतात. वृद्ध व्यक्ती, लहान मुलांना, आजारी लोकांना याचा त्रास होतो. या फटाक्यांवरून सर्वोच्च न्यायालयात खटला सुरु आहे. यावेळी सर्वोच्च न्यायालयाने फटाक्यांना घेऊन महत्वाचा आदेश जरी केला आहे.

आता सर्वोच्च न्यायालयाने दिवाळीपूर्वी दिल्ली-एनसीआरमधील फटाक्यांना घेऊन एक महत्वाचा आदेश जारी केला आहे. फटाक्यांवर पूर्णपणे बंदी नसणार आहे. मात्र २४ तास सतत फटाके देखील फोडण्याची परवानगी दिलेली नाही आहे. फटाके फोडण्याची वेळ आणि त्यांचा हा प्रकार आणि प्रदूषण नियंत्रणाच्या उपाययोजनांबाबत सर्वोच्च न्यायालयाने महत्वाचे निर्देश दिले आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, ते फटाक्यांवर संपूर्ण बंदी घालू शकत नाही असे म्हटले आहे. मात्र २४ तास सतत फटाके फोडण्याची परवानगीही देऊ शकत नाही. परंतु २४ तास सतत फटाके फोडण्याची परवानगीही देऊ शकत नाही. दिवाळीपूर्वी फटाक्यांच्या वापराशी संबंधित एका खटल्याच्या सुनावणीदरम्यान हा निर्णय घेण्यात आला. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की ते धार्मिक भावना आणि आरोग्य व पर्यावरणाच्या चिंता यांच्यात संतुलन साधून तोडगा काढण्यात येणार.

न्यायमूर्ती एम. एम. सुंदरेश म्हणाले, देशभरात संपूर्ण बंदी घातल्यास काही धार्मिक भावना दुखावल्या जातील. आम्ही देशभरात संपूर्ण बंदीच्या बाजूने नाही, परंतु आम्ही कुठेही २४ तास फटाके फोडण्याची परवानगी देणार नाही, कारण त्याचा परिणाम आजारी, वृद्ध आणि मुलांवर होतो.

कोणते फटाके फोडण्यास परवानगी

कोणते फटाके फोडण्यास परवानगी असेल हे अद्याप स्पष्ट झालेली नाही आहे. याबाबत विचार सुरु आहे. सीपीसीबी आणि केंद्र सरकारला बेरियमचा वापर आणि फटाक्यांच्या फटाक्यांची संयुक्त अग्निचाचणी घेऊन डेसिबल पातळीनिश्चित करण्यासाठी आणखी चाचण्या करण्यासाठी वेळ देण्यात आला आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी १५ ऑक्टोबर रोजी होणार आहे.

## दस्त नोंदणीसाठी आधार कार्ड अनिवार्य, १ ऑक्टोबरपासून नवा नियम लागू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज्याच्या महसूल विभागात गेल्या दोन वर्षांमध्ये अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. त्यामध्ये आणखी एका महत्त्वाच्या निर्णयाची भर पडली आहे. दस्त नोंदणीसाठी आधार कार्ड बंधनकारक करण्यात आलं आहे. जर दस्त करणाऱ्या पक्षकारांकडे आधार कार्ड नसेल तर त्यांच्या दस्ताची नोंदणी होणार नाही. विविध दस्तांची नोंदणी होत असताना खोटे साक्षीदार आणि खोटे पक्षकार उभे करुन केली जाणारी फसवणूक टाळण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. महाराष्ट्र शासनाच्यावतीनं या निर्णयासंदर्भातील राजपत्र प्रकाशित करण्यात आलं आहे.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दस्त नोंदणी संदर्भात महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. आधार नाही तर कोणतीच दस्त नोंदणी होणार नाही. दस्त नोंदणी करण्यासाठी आधार कार्ड बंधनकारक करण्यात आलं आहे. मालमत्ता खरेदी विक्रीतील फसवणूक टाळण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेवरून महसूलमंत्री बावनकुळे यांनी हा निर्णय घेतला आहेत.दस्तनोंदणी, जमीन खरेदी विक्रीच्या प्रकरणांमध्ये खोटे साक्षीदार, खोटे पक्षकार उभे करून होणारी फसवणूक आता हद्दपार होणार आहे. राज्य सरकारनं दस्त नोंदणीसाठी आधार कार्ड बंधनकारक केलं आहे. यामुळं खरेदी, विक्री, बक्षीस, गहाण, वाटणीसह ६३ प्रकारच्या नोंदीसाठी आधार आेळखपत्र सक्तीचे असेल. दस्तनोंदणीसाठी आधार कार्ड अनिवार्य करण्यात आल्याचा निर्णय १ ऑक्टोबरपासून लागू करण्यात येणार आहे. यासंदर्भात शासनाचं राजपत्र जारी झालं आहे. आता दस्त नोंदणी करताना आता आधार कार्ड बंधनकारक करण्यात आल्यानं खोटे साक्षीदार आणि खोटे पक्षकार उभे करता येणार नाहीत. यामुळं दस्त नोंदणीतील

### जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांचे निर्देश; विनापरवानगी गैरहजर राहिल्यास कडक कारवाई

### शेतकरी व ग्रामस्थांच्या अडचणींचा तातडीने निपटारा

## दुष्काळी परिस्थितीत अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या रजांवर निर्बंध; मुख्यालय सोडण्यासाठी पूर्वपरवानगी बंधनकारक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सोलापूर जिल्ह्यातील प्रशासन यंत्रणा सतर्क व गतिमान ठेवण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष एस. कार्तिकेयन यांनी जिल्हा व तालुकास्तरीय अधिकाऱ्यांच्या रजा मंजुरी व मुख्यालय सोडण्याबाबत मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत.

सोलापूर जिल्ह्यासह राज्यात पाणीटंचाई, चाराटंचाई व पिकांचे नुकसान झाल्याने शेतकरी मोठ्या आर्थिक व मानसिक संकटाला सामोरे जात आहेत. या पार्श्वभूमीवर दुष्काळ निवारणाच्या उपाययोजना तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रशासनाने पूर्ण क्षमतेने कार्यरत राहणे आवश्यक असल्याचे परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

मुख्यालय सोडण्यासाठी पूर्वपरवानगी आवश्यक-

महसूल, कृषी, ग्रामविकास, अन्नधान्य पुरवठा, नगरविकास, भूमिअभिलेख, महावितरण, पशुसंवर्धन, जलसंपदा, सोलापूर विद्यापीठ, सहकार, शिक्षण, सार्वजनिक बांधकाम, भूजल सर्वेक्षण, नीरा उजवा कालवा, हेस्कॉम पंप हाऊस विभाग, ग्रामीण पाणीपुरवठा, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मत्स्य विभाग, जिल्हा माहिती कार्यालय तसेच मृद व जलसंधारण आदी विभागांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दुष्काळ निवारण, पीक पाहणी, कर्ज पुनर्गठन व शेतकरी सहाय्याची कामे प्राधान्याने पूर्ण करावीत, असे निर्देश देण्यात आले आहेत.

दुष्काळी परिस्थिती सुरू असेपर्यंत संबंधित विभागांच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी मुख्यालय सोडण्यापूर्वी सक्षम प्राधिकाऱ्याची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहणार आहे.

रजा मंजुरीचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांकडे-

दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर नमूद विभागांतील क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या कोणत्याही प्रकारच्या रजा, तसेच जिल्ह्याबाहेर जाण्यासाठीची परवानगी केवळ जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्या पूर्वपरवानगीनेच घेता येणार आहे.





रजेचा अर्ज थेट जिल्हाधिकारी कार्यालयाकडे-

कोणत्याही अधिकाऱ्याने परस्पर अथवा आपल्या मूळ प्रशासकीय प्रमुखाकडून परस्पर रजा मंजूर करून घेऊन मुख्यालयातून गैरहजर राहू नये. रजेचा अर्ज संबंधित कारणांसह व विभागप्रमुखांच्या अभिप्रायासह थेट जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करावा. जिल्हाधिकारी कार्यालयाची लेखी पूर्वपरवानगी मिळाल्याशिवाय कोणालाही रजेवर जाता येणार नाही.

विनापरवानगी गैरहजेरीस कडक कारवाई- जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय रजेवर जाणे अथवा मुख्यालयात अनुपस्थित आढळल्यास संबंधित जिल्हा व तालुकास्तरीय अधिकाऱ्यांवर नियमानुसार कडक कारवाई करण्यात येईल. यामध्ये महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ अन्वये शिस्तभंगाची कारवाई तसेच आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ मधील संबंधित तरतुदींनुसार फौजदारी कारवाईचा समावेश आहे.

दुष्काळग्रस्त शेतकरी व ग्रामस्थांच्या अडचणी संवेदनशीलतेने ऐकून त्यांचा तातडीने निपटारा करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. कामातील कोणतीही कुचराई, दुर्लक्ष अथवा गैरहजेरी ही आपत्ती व्यवस्थापन कायद्याचा भंग मानली जाईल, असे परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे.

संपर्क व्यवस्था अद्ययावत ठेवण्याचे निर्देश

सर्व विभागप्रमुखांनी आपल्या अधिनस्त क्षेत्रीय अधिकाऱ्यांचे मोबाईल क्रमांक अद्ययावत ठेवावेत. आपत्कालीन परिस्थितीत संपर्क तात्काळ व प्रभावीपणे होण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांची संपर्क यादी जिल्हा कार्यालयास सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. या आदेशाची अंमलबजावणी करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित विभागप्रमुख व क्षेत्रीय अधिकाऱ्यांची राहणार असून आदेशाच्या अंमलबजावणीत कसूर झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित केली जाईल, असे जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी परिपत्रकाद्वारे स्पष्ट केले आहे.

## संपादकीय....

## सर्वोच्च न्यायालयाचा निकाल

दिवाळी म्हटलं की फटाके. फटाक्यांचा कुतूहल आणि आनंद मुलांमध्ये जास्त असतो. मात्र या फटाक्यांमुळे ध्वनी प्रदूषण, वायू प्रदूषण, आजार देखील होतात. वृद्ध व्यक्ती, लहान मुलांना, आजारी लोकांना याचा त्रास होतो. या फटाक्यांवरून सर्वोच्च न्यायालयात खटला सुरु आहे. यावेळी सर्वोच्च न्यायालयाने फटाक्यांना घेऊन महत्वाचा आदेश जरी केला आहे. आता सर्वोच्च न्यायालयाने दिवाळीपूर्वी दिल्ली-एनसीआरमधील फटाक्यांना घेऊन एक महत्वाचा आदेश जारी केला आहे. फटाक्यांवर पूर्णपणे बंदी नसणार आहे. मात्र २४ तास सतत फटाके देखील फोडण्याची परवानगी दिलेली नाही आहे. फटाके फोडण्याची वेळ आणि त्यांचा हा प्रकार आणि प्रदूषण नियंत्रणाच्या उपाययोजनांबाबत सर्वोच्च न्यायालयाने महत्वाचे निर्देश दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, ते फटाक्यांवर संपूर्ण बंदी घालू शकत नाही असे म्हटले आहे. मात्र २४ तास सतत फटाके फोडण्याची परवानगीही देऊ शकत नाही. परंतु २४ तास सतत फटाके फोडण्याची परवानगीही देऊ शकत नाही. दिवाळीपूर्वी फटाक्यांच्या वापराशी संबंधित एका खटल्याच्या सुनावणीदरम्यान हा निर्णय घेण्यात आला. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की ते धार्मिक भावना आणि आरोग्य व पर्यावरणाच्या चिंता यांच्यात संतुलन साधून तोडगा काढण्यात येणार. न्यायमूर्ती एम. एम. सुंदरेश म्हणाले, देशभरात संपूर्ण बंदी घातल्यास काही धार्मिक भावना दुखावल्या जातील. आम्ही देशभरात संपूर्ण बंदीच्या बाजूने नाही, परंतु आम्ही कुठेही २४ तास फटाके फोडण्याची परवानगी देणार नाही, कारण त्याचा परिणाम आजारी, वृद्ध आणि मुलांवर होतो.

# वृद्ध बांधवांनो, आपले हक्क जाणून घ्याहो

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
**(१-७ ऑक्टोबर:वृद्ध व्यक्तींचा आंतरराष्ट्रीय दिवस.)**

वृद्ध व्यक्तींचा आंतरराष्ट्रीय दिवस दरवर्षी १ ऑक्टोबर रोजी साजरा केला जातो. या दिवसाचा उद्देश वृद्ध व्यक्तींच्या हक्कांची जाणीव करून देणे, त्यांचे आरोग्य, सन्मान आणि अधिकार यांना प्रोत्साहन देणे आहे. वृद्ध व्यक्ती हे समाजाचे महत्त्वाचे घटक आहेत, ज्यांनी त्यांच्या ज्ञान, अनुभव आणि योगदानाने आपली पिढी घडवली आहे. श्रीकृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी सदर मार्गदर्शक संकलित लेख प्रस्तुत करताहेत जी.... संपादक.

या दिवसाच्या निमित्ताने वृद्ध व्यक्तींच्या समस्या आणि त्यांच्या गरजांकडे लक्ष वेधले जाते. त्यांना सन्मानाने जगता यावे, त्यांचे आरोग्य चांगले राहावे, आणि त्यांना एकटेपणाचा सामना करावा लागू नये यासाठी समाजाने जबाबदारी घेणे महत्त्वाचे आहे. त्यांच्या गरजा, स्वातंत्र्य आणि सामाजिक सहभाग वाढविण्याबाबत विचारमंथन केले जाते. मानवी जीवनातील वृद्धावस्था ही साधारणपणे ६५ वर्षांनंतर सुरू होणारी एक नैसर्गिक आणि महत्त्वाची अवस्था आहे. वृद्धावस्थेतील शारीरिक व मानसिक बदल: १ शारीरिक बदल: त्वचेवर सुरकुत्या पडणे, केस पांढरे व विरळ होणे, दृष्टी व श्रवणशक्ती कमी होणे. २ आरोग्य समस्या: सांधेदुखी, हाडे कमजोर होणे, स्मरणशक्ती मंदावणे आणि निद्रानाश. ज्ञानेंद्रिय व कर्मेंद्रियांची शिथिलता. ३ मानसिक स्थिती: एकाकीपण जाणवणे, कुटुंबाकडून प्रेमाची आणि आधाराची अपेक्षा असणे.

वृद्धांची काळजी व सामाजिक जबाबदारी: ४ आदर आणि सहानुभूती: ज्येष्ठांच्या अनुभवाचा आणि ज्ञानाचा सन्मान करणे ही आपली संस्कृती आहे. ४ आरोग्य सांभाळ: नियमित वैद्यकीय तपासणी, योग्य आहार आणि औषधोपचारांची वेळ पाळणे. ४ सरकारी योजना: निराधार व गरजू ज्येष्ठांसाठी शासनाकडून सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मार्फत वृद्धाश्रम आणि निवृत्ती वेतन योजना राबवल्या जातात.

दरवर्षी १ ऑक्टोबर रोजी आंतरराष्ट्रीय वृद्धांचा- ज्येष्ठ नागरिक दिन साजरा केला जातो.

जागतिक वृद्ध दिनाचे महत्त्व: ४ सन्मान करणे: समाजासाठी आणि कुटुंबासाठी आयुष्यभर मेहनत घेणाऱ्या वृद्ध व्यक्तींच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे. ४ जागरूकता वाढवणे: वृद्धांच्या आरोग्य व समस्या, एकाकीपण आणि त्यांच्याशी संबंधित इतर आव्हानांवर चर्चा करणे. ४ हक्कांचे रक्षण: वृद्धांच्या कायदेशीर हक्कांचे संरक्षण करणे आणि समाजात त्यांना योग्य तो मान मिळवून देणे. महत्त्वाचे कायदे व तरतुदी: १) भारतात आणि महाराष्ट्रात ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षेसाठी व कल्याणासाठी कायदे केले गेले आहेत, जसे की ''द मेंटेनन्स अँड वेल्फेअर ऑफ पेरेंट्स अँड सीनियर सिटीजन्स एक्ट २००७'' २) या कायद्यानुसार पालकाची व वृद्धांची काळजी घेणे, ही त्यांची मुले किंवा कायदेशीर वारसदार यांची कायदेशीर जबाबदारी आहे.

जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन ज्येष्ठ नागरिकांना समर्पित असून जगभरातील १ ऑक्टोबर रोजी हा दिवस लक्षात येतो. आजचा काळ हा वृद्ध प्रौढांवर प्रभाव पाडणार्या पॉईंट्सच्या बाबतीत चेतना वाढविण्यास समर्पित आहे. आजच्या घडीला आपण ज्येष्ठ नागरिकाने त्याच्या समर्पण, कर्तृत्व आणि त्यांनी आपल्या आयुष्यात जे काही प्रदाते दिले आहेत त्याबद्दल आपण त्यांचे कौतुक केले पाहिजे. वृद्धांना प्रभावित करणार्या समस्यांबद्दल जागरुकता वाढवून हा दिवस साजरा करतात, जसे की वृद्धत्व आणि वृद्धांवरील होणारे अत्याचार. वृद्ध व्यक्तींनी समाजासाठी केलेल्या योगदानाची प्रशंसा करण्याचा हा दिवस आहे. ज्येष्ठ नागरिकांचा जास्तीत जास्त वेळ सामाजिक कार्य आणि विकासासाठी असतो. ते खूप सेवाभावी आहेत आणि इतर व्यक्तीचे जीवन चांगले बनवण्यासाठी त्यांना काम करायला आवडते. त्यांच्या प्रयत्नांची प्रशंसा करणे महत्त्वाचे आहे. हा दिवस संपूर्णपणे ज्येष्ठांना समर्पित करण्यात आला आहे. वृद्धाश्रमात त्यांच्यासाठी बऱ्याच प्रकाराचे कार्यक्रम आयोजित केले जातात. त्यांच्या आनंदाची आणि आदराची काळजी घेतली जाते. विशेषतः त्यांच्या सोयीचा आणि समस्यांचा विचार केला जातो आणि त्यांच्या आरोग्याकडे गंभीरतेने जातीने लक्ष दिले जाते.

ज्येष्ठमंडळी आपल्यासाठी ईश्वराचे अवतार असतात, ज्यांच्या आशीर्वादामुळे आपले पालन होते, आपल्या मनात त्यांच्याप्रति प्रेम आणि आदर असणं स्वाभाविक आहे. परंतु त्यातूनही अधिक महत्वाचे आहे त्या परिस्थितीमध्ये त्यांना साथ देणं. जेव्हा ते असहाय्य आणि अक्षम असतात. तेव्हा त्यांच्याबद्दल आपले खरे प्रेम आणि खरी श्रद्धा दिसून येते. जरी हे समयाभावे नेहमी शक्य नसल्यास, एका दिवशी आपण त्यांबद्दल जेवढे शक्य असल्यास निष्ठावान असायला पाहिजे. कारण त्यांना प्रेमाशिवाय काहीही नको.

आपल्या सर्वांचें हे कर्तव्य आहे की आपण अशी वेळच येऊ देऊ नये की हा दिवस त्यांना वृद्धाश्रमात साजरा करावा लागेल. म्हणून प्रत्येक नागरिकांचे हे कर्तव्य आहे की ते आपल्या घरच्या वडिलधाऱ्यांची आणि ज्येष्ठांची काळजी घ्यावी आणि त्याचा सांभाळ चांगल्या प्रकारे करावा. विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी!

!! जागतिक ज्येष्ठ नागरिक- वृद्ध दिनाच्या समस्त सुज्ञ मानव परिवारास सप्ताहभर हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!

**- संकलन व सुलेखन -**
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी.**
**(दिनविशेषकार)**
**राह. श्रीगुरूदेव प्रार्थनामंदिर जवळ, रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सप- ९४२३७१४८८३.**

# अनुवादाचे महत्त्वः संपर्क-कौशल्य-ज्ञानवृद्धी आणि सांस्कृतिक देवाणघेवाण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

(३० सप्टेंबर ते ०६ ऑक्टोबर:आंतरराष्ट्रीय अनुवाद दिन सप्ताह.)

आंतरराष्ट्रीय अनुवाद दिन दरवर्षी ३० सप्टेंबर रोजी साजरा केला जातो. हा दिवस जगभरातील अनुवादक, भाषांतरकार आणि भाषाशास्त्रज्ञ यांचा सन्मान करण्यासाठी आणि भाषांतराचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी आहे. अनुवादक वेगवेगळ्या भाषांतील साहित्य, ज्ञान आणि विचार यांची देवाणघेवाण सुलभ करतात. ते विविध संस्कृती आणि समुदायांना जोडण्याचे काम करतात, ज्यामुळे जागतिक संवाद, समजूतदारपणा आणि सहकार्य वाढते. श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजींचा सदर माहितीपूर्ण संकलित लेख वाचक मित्रांना समर्पित जी.... संपादक.

या दिवसाचा उद्देश अनुवादाच्या माध्यमातून भाषांतर आणि भाषिक अडथळे दूर करून ज्ञानाचा प्रसार करणे आहे. शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान, व्यापार, कला आणि राजकारण अशा विविध क्षेत्रांत अनुवादकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. अनुवादाच्या माध्यमातून लोक एकमेकांच्या भाषा, संस्कृती आणि परंपरांचा आदर करतात आणि जागतिक एकात्मता वाढते. एका भाषेतील मजकूर किंवा अर्थ मूळ आशयाला धक्का न लावता दुसर्या भाषेत मांडण्याची प्रक्रिया म्हणजे अनुवाद होय. अनुवादाचे स्वरूप आणि प्रकार पुढीलप्रमाणे आहेत- अनुवादाचे मुख्य दोन प्रकार: १) शाब्दिक अनुवाद: मूळ शब्दांचे थेट भाषांतर केले जाते. उदा. वैज्ञानिक किंवा तांत्रिक लेख. २) अर्थानुवाद: मूळ भाषेचा गाभा व भावना जपत दुसऱ्या भाषेत योग्य प्रकारे अर्थ व्यक्त केला जातो. अनुवादाचे महत्त्व: ४ संवाद साधणे: वेगवेगळ्या भाषेतील लोकांशी संपर्क साधणे सोपे होते. ४ ज्ञान समृद्धी: जागतिक साहित्य, विज्ञान आणि तंत्रज्ञान मातृभाषेत उपलब्ध होते. ४ संस्कृतीची देवाणघेवाण: एका संस्कृतीतील विचार दुसऱ्या संस्कृतीपर्यंत पोहोचतात.

आवश्यक कौशल्ये: १ भाषिक ज्ञान: मूळ भाषा- स्रोतभाषा आणि ज्या भाषेत अनुवाद करायचा आहे ती भाषा- लक्ष्यभाषा, या दोन्हीवर प्रभुत्व. २ सांस्कृतिक संदर्भ: म्हणी, वाक्प्रचार आणि सामाजिक संदर्भ समजण्याची क्षमता. एका भाषेतला मजकूर दुसऱ्या भाषेत, त्या शब्दांतील, वाक्यांतील आणि लिखाणातील भाव, विचार आणि दृष्टिकोन ह्यांच्यासहित नेमकेपणाने व्यक्त करण्याचा प्रयत्न करणे म्हणजे अनुवाद होय. अनुवाद म्हणजे भाषांतर नव्हे! बरेचदा भाषांतर आणि अनुवाद यांना एकसारखेच स्थान दिले जाते. मात्र तसे नाही. भाषांतर आणि अनुवाद यांच्यातला फरक खरेतर तसा सूक्ष्म आहे, पण फार मोठ्या अर्थाचा अनर्थसुद्धा करू शकतो. भाषांतर करताना मूळ शब्द किंवा वाक्यरचना जशीच्या तशी ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. जसे एका भाषेतील शब्दाला दुसऱ्या भाषेतील शब्द योजने. एकेका शब्दापुरते भाषांतर मर्यादित असल्यास विशेष बाब नाही. मात्र शब्दसमूह अर्थात वाक्यरचनांचे भाषांतर करत असताना, शब्दाला शब्द हा दृष्टिकोन ठेवल्यास मूळ वाक्यांच्या आणि लिखाणाच्या भावार्थाचा ऱ्हास घडून येतो. अनुवादात मूळ लेखनाचे शब्दशः रूपांतर न करता त्यातला मथितार्थ समजून घेणे व सौंदर्यस्थळे जाणून घेऊन ती योग्य रीतीने अनुवादात उतरवणे, आवश्यक असते.

अनुवाद आणि शब्दशः भाषांतर यांच्यातील फरक दाखवणारा हा छोटासा नमुना पहा - इंग्रजीत ''ख डींशर्ू'' चे शब्दशः भाषांतर मी प्रेम तू असे होते. खरे तर हे भाषांतरही नव्हे, पण नमुन्यादाखल दिले आहे. मात्र अनुवादात ''ख डींशर्ू'' चा अनुवाद माझे तुझ्यावर प्रेम आहे. असा होतो. खरेतर हे अतिशय साधे उदाहरण आहे, मात्र मोठमोठ्या वाक्यांचे, साहित्य कृतींचे अनुवाद करताना ही बाब दुर्लक्षित केल्यास मोठ्या चुका घडून अनुवादाचा- लिखाणाचा विचका होऊ शकतो. अशा चुका टाळण्यासाठी अनुवादकांना विशेष दक्षता घ्यावी लागते. मूळ लेखक, त्यांचे दृष्टिकोन, लेखनामागचा उद्देश, स्रोत भाषा, भाषेची मांडणी, भाषेचे सौंदर्य अशा नानाविध गोष्टी लक्षात घेऊन, त्या वाक्यांचा वरवर लक्षात येणारा अर्थ, त्यांचा लक्ष्यार्थ अर्थात अर्थाचा मूळ गाभा, आत्मा जाणून घेऊन जो अनुवाद करू शकतो, तो खरा आणि उत्तम अनुवादक होतो. नवागत अनुवादकांनी हे धोरण लक्षात ठेवूनच अनुवाद केला पाहिजे. सोप्या भाषेत अनुवाद हे भाषांतराचे पुढचे पाऊल म्हणावे लागेल.

अनुवाद प्रक्रिया: अनुवाद प्रक्रियेत ज्या भाषेतला मजकूर दुसऱ्या भाषेत आणायचा असतो, त्या भाषेला मूळ भाषा किंवा उगम भाषा अथवा स्रोत भाषा म्हणतात आणि ज्या भाषेत तो मजकूर आणला जातो त्या भाषेला लक्ष्यभाषा म्हणतात. चांगल्या अनुवादासाठी अनुवादकाला दोन्ही भाषांची उत्तम जाण असावी लागते. त्याचा दोन्ही भाषांचा सखोल अभ्यास असावा लागतो. त्याचे शब्दज्ञान आणि शब्दसंग्रह परिपूर्ण असावा लागतो. अर्थात हे काम करताना आणि अभ्यासाने हे ज्ञान वाढत जाते.

अनुवादकाला दोन्ही भाषांतील व्याकरणाचेही ज्ञान असावे लागते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे अनुवादकाला स्रोत भाषा आणि लक्ष्य भाषा बोलणाऱ्या समूहाची किंवा समाजाची भाषिक, सांस्कृतिक जाण, बोलीभाषा- पद्धती ह्यांचीही आवश्यक ती माहिती, समज असायला पाहिजे. मुळात अनुवादक हा अतिशय सृजनक्षम आणि संवेदनशील असावा लागतो. कारण प्रत्येक भाषा वेगळी असते. प्रत्येक भाषेची धाटणी - मांडणी वेगवेगळी असते. तिच्यातील शब्दांच्या समूहरचनेची अर्थात वाक्यरचनेची पद्धतसुद्धा वेगळी असते. त्या शब्दसमूहांच्या मांडणी-बदलातून घडून येणारे अर्थही त्यामुळे बरेचदा भिन्न होत जातात. जसे काही काही वाक्ये द्व्यर्थी असतात वा सरळ सरळ अर्थ न सांगणारी असतात - उदा. म्हणी, वाक्प्रचार, प्रांतीय / पारंपारिक संदर्भांनी सजलेली वाक्ये. काही म्हणी वा वाक्प्रचार तर असे असतात, जे केवळ त्या त्या प्रांतीय भाषेतच उपलब्ध असतात. त्यांचे संदर्भही तसेच मर्यादित असतात. अशा वाक्यरचना वा असे लिखाण असल्यास विशेष काळजी घ्यावी लागते. अशा वाक्यांचा अनुवाद हा त्यातला मूळ उद्देश, सौंदर्य बिघडू न देता अतिशय खुबीने करावा लागतो. त्यातला तो विशेष अर्थ अनुवाद वाचणाऱ्या वाचकाला नीट समजून यावा म्हणून विशेष मेहनत घ्यावी लागते. त्यामुळे अनुवादकांचे काम सोपे अजिबात नाही. मात्र जो हे काम करू लागतो, त्याचे भाषाविश्व आणि शब्दविश्व अधिकाधिक समृद्ध होत जाते. अनुवादाऐवजी भाषांतर घडले असल्यास ती वाक्ये, माहिती, जाहिरातीतील गाण्यांच्या आोळी, सिनेमातले संवाद निश्चितपणे खटकतात. ही बाब हेच दाखवते की, अनुवादकाच्या कामात काही गडबड आहे. थोडक्यात म्हणजे अनुवाद असा हवा की, जरी एकप्रकारे अनुवाद हा ''मूळ प्रतीची कॉपी'' अर्थात ''मूळ लेखनाची प्रतिप्रत'' असला तरीही निर्माण होणारी अनुवादित कलाकृती ही नवनिर्मिती वाटली पाहिजे, मूळ भाषेतील मसुद्याप्रमाणेच ही कलाकृती सुंदर, नाविन्यपूर्ण, आनंददायी आणि शैलीदार असायला हवी. म्हणूनच म्हटले आहे की, तो अनुवादक सृजनक्षम असावा लागतो. तरच निर्माण होणाऱ्या साहित्यकृतीतून अनुवादक आणि वाचक दोघांनाही आनंद मिळू शकतो. ज्या लेखकांनी अनुवाद करण्याचे काम केले आहे, त्यांचे अनुभवसुद्धा नवोदितांना मार्गदर्शक ठरू शकतात.

भाषांतर: साधारणपणे जिथे मूळ अर्थात फारसा फरक पडणार नाही, अशा गोष्टी भाषांतरात येऊ शकतात. जसे सरकारची वा संस्थेची नियमावली, वस्तूंच्या याद्या, अकाउंट्समधील आकडे /हिशोब /गणिते / पद्धती / नमुने / विज्ञानशाखेतील समीकरणे, अर्थशास्त्रातील नियम - सिद्धान्त वगैरे गोष्टींचा अनुवाद नाही, तर भाषांतर होऊ शकते. संधी: वर उल्लेख केल्याप्रमाणे, अनुवाद हा ललित साहित्यकृतींचा जसे - पुस्तके, कथा, कादंबऱ्या, कविता, नाटक, विवेचन, ललित लेख, गाणी, चरित्र, टीका-टिपण्या, शैक्षणिक माहिती, अग्रलेख आणि तत्सम सर्व गोष्टी ज्या साहित्य प्रकारात येतात, त्यांचा होऊ शकतो. हे क्षेत्र विस्तृत आहे. आज वरील साहित्य प्रकारांसोबतच इतरही अनेक क्षेत्रांमध्ये जसे- जाहिराती, सिनेमा, मालिका वगैरे जाणत्या अनुवादकांची गरज निर्माण झाली आहे. वैश्विकिकरणामुळे इंग्रजी भाषेचं महत्त्व वाढलेले आहे. सर्व अद्ययावत माहिती इंग्रजी भाषेमध्ये असल्यामुळे इंग्रजीला जगाची ज्ञानभाषा म्हणतात. स्वभाषेलाच महत्त्व देणाऱ्या प्रगत राष्ट्रांमध्ये त्यांच्या त्यांच्या भाषांमध्ये लेखन होते. इतर देशांत वा प्रांतात ते लिखाण पोहोचवण्यासाठी अनुवादक फार मोठे कार्य जबाबदारीने पार पाडत असतात.

तसेच विविध खाजगी क्षेत्रांतील आवश्यकता आणि उपलब्धता: भारत हा बहुभाषिक देश असल्यामुळे इथे प्रांतिक तसेच जागतिक भाषेतही अनुवाद होत असतात. अनुवादाला पर्यायाने अनुवादकांना तसेच भाषांतरकार ह्यांना महत्त्व प्राप्त झाले आहे. महाराष्ट्रापुरते बोलायचे झाले तर सरकारने या अनुवाद कार्यासाठी स्वतंत्र भाषा संचालनालय निर्माण केले आणि भाषा सल्लागार मंडळाची स्थापना केली आहे. त्यांच्या अथक प्रयत्नांमधून प्रशासनिक मराठी भाषेचा विकास झालेला आहे, हे सर्वज्ञात आहे. आज सरकारच्या सर्व व्यवहारात, विधान मंडळाच्या कामकाजात सर्वत्र मराठीचा वापर होतो. त्यामुळे इंग्रजी भाषेवर प्रभुत्त्व असणाऱ्या आणि मराठी भाषेचा पदव्युत्तर अभ्यास केलेल्या मुलामुलींना भाषा संचालनालय, विधान मंडळ इत्यादी ठिकाणी भाषांतरकार आणि अनुवादक म्हणून नोकरीच्या संधी उपलब्ध होऊ शकतात.

कामांचे स्वरूप पुढीलप्रमाणे असू शकते - १ अर्थसंकल्पीय तसेच प्रशासनिक व नियम पुस्तिकांचा अनुवाद करणे. २ विधिविषयक अनुवाद व परिभाषा तयार करणे. अल्पसंख्यांक भाषांतून अनुवाद करणे. ३ न्याय व्यवहार: सरकारी व्यवहाराप्रमाणे न्यायव्यवहारातही राजभाषा मराठीचा वापर अनिवार्य झाल्यामुळे न्यायव्यवहार क्षेत्रांमध्ये, न्यायालयांमध्ये भाषांतरकार आणि अनुवादकांची मोठ्या प्रमाणावर गरज निर्माण झालेली आहे. इथे केवळ मराठीमध्ये भाषांतर/ अनुवाद करणाऱ्यांचीच नाही तर मराठीतून किंवा अन्य भारतीय भाषांमधून इंग्रजीमध्ये भाषांतर/ अनुवाद करणाऱ्यांचीही गरज आहे. तसेच नोकरी न करता स्वतंत्रपणे हे काम करूनही अर्थार्जन करता येईल. ४ प्रसारमाध्यमे: वृत्तपत्रे, नियतकालिके, रेडियो, दूरदर्शन यांसारख्या प्रसारमाध्यमांमध्येही अनुवादकांची सातत्याने निकड भासत असते. जाहिरातक्षेत्रही झपाट्याने विकसित होत असल्याने या क्षेत्रात अनुवादकांची सातत्याने गरज वाढत आहे. ५ याव्यतिरिक्त विज्ञान, तंत्रज्ञान, वैद्यक इत्यादींसारख्या महत्त्वाच्या अभ्यासक्षेत्रांमध्येही अनुवादकांची गरज असते. इंग्रजीमधून सातत्याने प्रस्तृत होणारे अद्ययावत ज्ञान मराठी भाषेमध्ये किंवा अन्य कोणत्याही भारतीय भाषेमध्ये आणणे, हे अतिशय अवघड काम आहे. अभ्यासू अनुवादकांची या क्षेत्रात खूप गरज आहे. ६ परिभाषा: वैज्ञानिक आणि तांत्रिक विषयांचे लेखन, कायद्याचे लेखन हे परिभाषानिष्ठ लेखन असते. त्यामुळे अशा प्रकारच्या लेखनाचा अनुवाद करण्यासाठी अनुवादकाकडे त्या त्या विषयाच्या परिभाषेचे ज्ञान असावे लागते, तसेच वेळप्रसंगी गरज पडल्यास पारिभाषिक शब्द तयार करण्याची क्षमता असायला हवी. कारण अशा प्रकारच्या लेखनात परिभाषेचा अचूक वापर करावा लागतो, विचार निःसंदिग्धपणे मांडावे लागतात. वाक्ये सुटसुटीत लिहून अनावश्यक क्लिष्टता, बोजडपणा टाळावा लागतो. प्रशिक्षणाने आणि नंतर अनुवादकाच्या व्यक्तिगत अभ्यासाने, सरावाने हे जमू लागते.

अनुवाद - एक कलाविष्कार: थोडक्यात म्हणजे अनुवाद ही कला आहे, तसेच त्याचे शास्त्र आणि तंत्रही आहे. सृजनशीलता आणि अभ्यास यांच्या योगाने या क्षेत्रात यश मिळवता येते. सुयोग्य प्रशिक्षण कार्यक्रम तयार करून अनुवादकांना प्रशिक्षण दिल्यास अनुवाद प्रशिक्षक म्हणूनही यशस्वी व्यवसाय करणं शक्य आहे. दळणवळणाच्या साधनांनी जसे जगातले अंतर दिवसेंदिवस कमीकमी होते आहे, तसेच अनुवाद आणि भाषांतरामुळे जग जवळ येते आहे. आज अनुवादाचे महत्त्व सगळ्यांना पटले आहे. त्यामुळे या क्षेत्रात अर्थार्जनाच्या आणि स्वतःचे असे वेगळे स्थान निर्माण करण्याच्या संधी निर्माण होत आहेत. त्यांचा सुजाणपणे विचार करायलाच हवा. विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी!

!! आंतरराष्ट्रीय अनुवाद दिनाच्या समस्त साहित्यिकांना सप्ताहभर प्रेरणादायी हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!

**- संकलन व सुलेखन -**
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी.**
**(दिनविशेषकार)**
**राह. श्रीगुरूदेव प्रार्थनामंदिर जवळ, रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त मधुभाष- ९६९९८३६७१७.**

# जिल्हा परिषद शाळांना भौतिक सुविधा सह दर्जेदार शिक्षणावर भर देणार; सोलापूर जिल्हा परिषदेची शिक्षण समिती सभापती चेतन सिंह केदार सावंत यांची उद्दिष्ट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : सोलापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांच्या भौतिक सुविधांचा दर्जा उंचावून विद्यार्थ्यांना अधिक चांगला दर्जेदार शैक्षणिक वातावरण शिक्षण मिळावे, यासाठी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण विभागाची सभापती चेतन सिंह केदार सावंत यांनी एक अत्यंत अनुभवी वस्तूचे उपक्रम हाती घेतला आहे जिल्ह्यात भौतिक सुविधाच्या श्रेणीकरणात डॉक्टर श्रेणीत असलेल्या ५७१ शाळांचा दर्जा सुधारून ड्रसेने अनुसार

**माजी विद्यार्थ्यांना जिल्हा परिषद शाळेची जोडणारा सभापती चेतन सिंह केदार सावंत, जिल्हा परिषद शाळेतून शिक्षण घेऊन आज उच्च पदावर कार्यरत असलेल्या तसेच विविध क्षेत्रातील यशस्वी झालेली माजी विद्यार्थ्यांचा शाळा स्तरीय मेळावा आयोजित करण्याचा विचार आहे या माध्यमातूनच माजी विद्यार्थ्यांना आपल्या शाळेच्या विकासात योगदान देण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाणार आहे.**

शाळांची संख्या पूर्णपणे ठाम उद्दिष्ट या उपक्रमाद्वारे ठेवण्यात आले आहे.

सोलापूर जिल्ह्यातील सुमारे २००७६८ जिल्हा परिषद शाळांच्या सविस्तर आढावा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिनांक २१ सप्टेंबर रोजी घेतला आहे या बैठकीदरम्यान ड श्रेणीतील शाळांची श्रेणी वाढ करण्यासाठी अंदाजे ६१ कोटी रुपयांचा आवडावे निधीची गरज असल्याचे समोर आले आहे ही मोठी गरज लक्षात घेऊन केवळ शासकीय निधीवर अवलंबून न राहता समाजातील सर्व घटकांना आणि दानशूर व्यक्तींना शाळांच्या विकासासाठी जोडण्याच्या नवाब क्रम आखण्यात आला आहे केवळ ड, श्रेणीतील शाळांचा श्रेणीनुसार शाळांच्या पायाभूत सुविधांचा गुणवत्ता वाढीच्या टप्प्याटप्प्याने दर्जा सुधारणा, शाळांच्या भौतिक सुविधा सुधारल्याशिवाय विद्यार्थ्यांना दर्जेदार शैक्षणिक वातावरण उपलब्ध होणार नाही त्यामुळे शासनाच्या निधी सोबत समाजाची प्रत्येक घटकांचा सहभाग घेऊन श्रेणीतील शाळांची संख्या शून्यावर आणण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे त्याच धर्तीवर आगामी काळात पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्राची माहिती घेऊन याचे वर्गीकरण करण्यात येईल अशी प्रतिक्रिया या संदर्भात बोलताना सोलापूर जिल्हा परिषदेचे शिक्षण सभापती चेतनसिंह केदार सावंत म्हणाले.




हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# निफाडमध्ये भटक्या कुत्र्यांच्या प्रश्नावर भाजप आक्रमक!

## नगरपंचायतीविरोधात टाळ आंदोलन करून निषेध





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड शहरातील वाढत्या भटक्या कुत्र्यांच्या समस्येवरून भारतीय जनता पार्टीने आक्रमक भूमिका घेतली असून, निफाड नगरपंचायत च्या गेट समोर दिनांक ३० सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता टाळ वाजवत भाजपाच्या वतीने आंदोलन करण्यात आले, निफाड शहरातील कुत्र्यांच्या वाढत्या त्रासामुळे,नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आणला आहे. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक तसेच रस्त्याने ये-जा करणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षेबाबत चिंता व्यक्त करत नगरपंचायत प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे.

> **लोकशाहीने आंदोलन करण्याचा प्रत्येकाला अधिकार दिला असून आंदोलन हे सनदशीर मार्गाने झाले पाहिजे परंतु तसे न होता विरोधक श्रेयवाद घेण्यासाठी केविलवाना प्रयत्न करताना दिसतात, भटक्या कुत्र्यांच्या नावाखाली. कुणा एखाद्या व्यक्तीला व्यक्तीला टार्गेट करायचे व राजकारण करायचे हे हे चुकीचे आहे, यामुळे गावाची बदनामी होते नागरिकांच्या सेवेसाठी निफाड नगरपंचायत सदैव तत्पर असून कुत्र्यांच्या बाबतीत नागरिकांची सुरक्षा डोळ्यासमोर ठेवून लवकरच प्रयत्न केले जातील स्थायी समितीत टेंडर झालेले असून ते मीटिंगमध्ये मंजूर झाल्यानंतर पुढील कारवाई केली जाईल, वेगवेगळे आरोप करून नगरपंचायतला बदनाम करण्याचे काम हे विरोधकांनी थांबविले पाहिजे,**
>
> **– अनिल पाटील कुंदे**
> **उपनगराध्यक्ष निफाड नगरपंचायत**

यावेळी नगरपंचायतीचे मुख्याधिकारी धीरज भामरे यांच्या भूमिकेबाबतही तीव्र शब्दांत टीका करण्यात आली आहे. निफाड शहराच्या लोकांना धोका हा भटक्या कुत्र्यांपासून नाही तर त्यांच्या जीवाला धोका हा इथल्या मुख्याधिकारी धीरज भामरे पासून आहे... अशा आशयाचा मजकूर बॅनरवर प्रसिद्ध करण्यात आला असून, कुत्र्यांच्या चाव्यापासून मरण्यापेक्षा आम्हाला इच्छामरणाची परवानगी द्या, अशी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आली यावेळी आंदोलनादरम्यान करण्यात आली यात्प्रसंगी मुकुंद राजे होळकर, संजय गाजरे, जावेद शेख यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

याप्रसंगी आंदोलनकर्त्यांच्या वतीने निफाड नगरपंचायत च्या अधिकारी मयुरी नवले यांना निवेदन देण्यात आले.

शहरातील विविध चौकांमध्ये भाजपच्या वतीने लावण्यात आलेले बॅनरचा चर्चेचा विषय ठरला असून निफाड शहरातील नागरिक आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी झाले होते, भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या संख्येवर नियंत्रण आणण्यासाठी तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी नगरपंचायतीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी यावेळी टाळ वाजवत आंदोलनाच्या माध्यमातून करण्यात आली . याप्रसंगी संजय गाजरे, संजय कुंदे, जावेद शेख, मुकुंदराजे होळकर, गणेश कापसे, आहेर वकील, नवनाथ धारराव, समीर कुंदे, अविनाश राऊत आदी नागरिक यावेळी उपस्थित होते

शहरातील नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न लक्षात घेता प्रशासनाने या समस्येकडे गांभीर्याने पाहून योग्य उपाययोजना कराव्यात, अशी मागणी यावेळी करण्यात आली

> **निफाड शहरामध्ये मोठ्या प्रमाणात मोकाट कुत्र्यांचा वावर वाढलेला असून लहान मुल, नागरिक तसेच दुचाकी स्वारांना या मोकाट कुत्र्यांचा मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत आहे.. निफाड नगरपंचायत प्रशासना ला भारतीय जनता पार्टी व निफाड शहर नागरिकांच्या वतीने. या ठिकाणी टाळ आंदोलन करून निवेदन देण्यात आले आहे ,. लवकरात लवकर या मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा अशी विनंती प्रशासनाला करण्यात आली आहे . प्रशासनाने पण या ठिकाणी आम्हाला. दोन ते तीन दिवसांमध्ये कारवाई करू असे सांगण्यात आले..... शासनाचे नियमाप्रमाणे या ठिकाणी लेखी स्वरुपात निवेदनाप्रमाणे आम्ही पदाधिकारी यांचा मान ठेवून आमचे आंदोलन या ठिकाणी आम्ही स्थगित करत आहोत**
>
> **– मुकुंदराजे होळकर**
> **माजी उपनगराध्यक्ष**



# ‘दैनिक यश सिद्धी न्यूज’च्या बातमीचा धडाका: दरेगाव येथील जिओ टॉवरचे काम अखेर सुरु; नेटवर्क पूर्ववत होण्याचा मार्ग मोकळा

दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क

दरेगाव व लगतच्या परिसर गेल्या काही दिवसांपासून 'जिओ' (गळे) मोबाईल टॉवरची नेटवर्क रेंज गायब झाल्यामुळे स्थानिक नागरिकांना, विद्यार्थ्यांना आणि व्यापाऱ्यांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत होता. या गंभीर समस्येकडे प्रशासनाचे व संबंधित कंपनीचे लक्ष वेधण्यासाठी 'दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क'ने बातमी प्रसिद्ध करताच जिओ प्रशासनाला अखेर जाग आली असून, टॉवरची सुविधा व नेटवर्क सुरळीत करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू करण्यात आले आहे.

दरेगाव येथील जिओ टॉवरची रेंज अचानक अत्यंत कमी झाल्याने तसेच वारंवार नेटवर्क गायब होत असल्याने ग्रामस्थांचा बाहेरील संपर्क पूर्णपणे तुटला होता. ऑनलाईन शिक्षण घेणारे विद्यार्थी, वर्क फ्रॉम होम करणारे कर्मचारी, शेतकरी आणि डिजिटल बँकिंग व्यवहार करणाऱ्या नागरिकांना नेटवर्कअभावी मोठा फटका बसत होता. स्थानिक ग्रामस्थांनी यापूर्वी अनेकदा कंपनीच्या अधिकाऱ्यांकडे फोन वरती बोलून तक्रारी केल्या होत्या, मात्र त्याकडे सातत्याने दुर्लक्ष केले जात होते.

ग्रामीण भागातील नागरिकांची ही होणारी गैरसोय लक्षात घेऊन 'दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क'ने या समस्येची गांभीर्याने दखल घेतली व सडेतोड वृत्त प्रसारित केले.

'दैनिक यश सिद्धी'चा इम्पॅक्ट

बातमी प्रसारित होताच जिओ कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांमध्ये खळबळ उडाली. बातमीची तत्काळ दखल घेत कंपनीने तांत्रिक टीमला दरेगाव येथील टॉवरवर रवाना केले. टॉवरमधील बिघाड शोधून रेंज वाढवण्यासाठी लागणारी तांत्रिक उपकरणे बदलण्याचे काम तातडीने हाती घेण्यात आले आहे. येत्या २४ ते ४८ तासांत संपूर्ण परिसरातील नेटवर्क क्षमता पूर्ववत होईल, असे आश्वासन कंपनीच्या कर्मचाऱ्यांकडून देण्यात आले आहे.

ग्रामस्थांकडून मानले आभार

'दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क'ने सर्वसामान्यांच्या समस्येला वाचा फोडून प्रशासनाला आणि कंपनीला काम करण्यास भाग पाडले, याबद्दल दरेगाव येथील ग्रामस्थ, तरुण वर्ग आणि लोकप्रतिनिधींनी 'दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क'चे विशेष आभार मानले आहेत. जनहितार्थ आणि सत्य बातमीदारीचा हा विजय असल्याचे मत या वेळी नागरिकांनी व्यक्त केले.

# सेवा संकल्प अभियानांतर्गत उल्हासनगरात वृक्षारोपण



**शहरातील हरित पट्टा वाढविण्यासाठी महापालिकेचा पुढाकार**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उल्हासनगर /प्रतिनिधी बाळासाहेब अहिरे

उल्हासनगर : महाराष्ट्र शासनाच्या सेवा संकल्प अभियान अंतर्गत विविध लोकाभिमुख, सामाजिक व नागरिकाभिमुख उपक्रम राबविण्यात येत आहेत. या अभियानाच्या अनुषंगाने उल्हासनगर महानगरपालिकेच्या उद्यान विभागाच्या वतीने बुधवार, ३० सप्टेंबर २०२६ रोजी शहरात वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

महापालिका आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उपायुक्त (उद्यान) यांच्या नियंत्रणाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. गोल मैदान, उल्हासनगर-२ तसेच श्याम लाल उदासी उद्यान, उल्हासनगर-५ येथे विविध प्रकारच्या वृक्षांच्या रोपांची लागवड करण्यात आली.

या कार्यक्रमास उपमहापौर अमर गोविंदराम लुंड, सभापती सुहाना जसवानी, सहायक आयुक्त अजय साबळे, सहायक आयुक्त अक्षय पाटील, विभागप्रमुख उद्यान अजित गोवारी, विभागप्रमुख पर्यावरण विशाखा सावंत, उद्यान अधीक्षक विष्णु राठोड यांच्यासह महापालिका अधिकारी, कर्मचारी, माळी-मजूर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोगनवेल, आंबा, गुलमोहर, पाम ट्री, मोह, तान्हण आणि करंज आदी विविध प्रजातींच्या रोपांचे वृक्षारोपण करण्यात आले. लावण्यात आलेल्या रोपांचे संगोपन व संवर्धन करण्याची जबाबदारी उद्यान विभागामार्फत घेण्यात येणार आहे. तसेच नागरिकांनीही या झाडांचे जतन व संवर्धन करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले.

शहरातील हरित पट्टा वाढविणे, पर्यावरणाचा समतोल राखणे आणि प्रदूषण कमी करणे या उद्देशाने महानगरपालिकेच्या माध्यमातून अशा प्रकारचे उपक्रम पुढेही राबविण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

# स्वेरी फार्मसीच्या ऑटोमेटेड एक्स्ट्रुडेबिलिटी या उपकरणाच्या डिझाइन पेटंटला भारत सरकारची मंजुरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर: स्वेरीज् कॉलेज ऑफ फार्मसीच्या संशोधन व नवोपक्रमाच्या क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीमध्ये आणखी एका महत्त्वपूर्ण उपलब्धीची भर पडली आहे. महाविद्यालयातील संशोधकांनी विकसित केलेल्या 'ऑटोमेटेड डिवाइस फॉर इव्हॅल्युएटिंग एक्स्ट्रुडेबिलिटी ऑफ सेमी सॉलिड फॉर्म्युलेशन' या नावीन्यपूर्ण उपकरणाच्या डिझाइनची भारत सरकारच्या संबंधित विभागाकडे अधिकृत नोंदणी करण्यात आली आहे.

या रचनेची अधिकृत नोंदणी भारत सरकारच्या डिझाइन कार्यालयाकडे करण्यात आली असून तिचा डिझाइन क्रमांक ५११३७-००१असा आहे. या रचनेची नोंदणी तारीख २७/०७/२०२६ असून ती वर्ग १०-०४ अंतर्गत नोंदणीकृत झाली आहे. या नोंदणीचे प्रमाणपत्र दि. ०८/०९/२०२६ रोजी जारी करण्यात आले असून प्रमाणपत्रावर अनुक्रमांक २५२६४३ नमूद आहे. सदर नोंदणी डिझाइन अधिनियम २००० आणि डिझाइन नियम २००१ मधील तरतुदींनुसार करण्यात आली आहे. फार्मास्युटिकल क्षेत्रात क्रीम, जेल, मलम, पेस्ट आणि इतर सेमी सॉलिड औषधी फॉर्मुलेशनच्या गुणवत्तेचे मूल्यमापन करताना विविध भौतिक व यांत्रिक गुणधर्मांचा अभ्यास केला जातो. त्यामध्ये एक्स्ट्रुडेबिलिटी हा एक महत्त्वाचा गुणधर्म आहे. औषधाचे फॉर्मुलेशन ट्यूब किंवा कंटेनर मधून योग्य प्रमाणात आणि नियंत्रित दाबाने बाहेर काढता येणे यास एक्स्ट्रुडेबिलिटी असे म्हणता येते. एक्स्ट्रुडेबिलिटी चाचणीद्वारे फॉर्मुलेशन मधून औषध बाहेर काढण्यासाठी आवश्यक असलेला दाब,फॉर्मुलेशनची सुसंगतता आणि त्याची वापरातील सुलभता यांचे मूल्यमापन करता येते. विशेषतः त्वचेवर किंवा शरीराच्या विशिष्ट भागावर थेट लागू करण्यात येणाऱ्या सेमी सॉलिड साठी हा गुणधर्म रुग्णांच्या वापरातील सोयीशी संबंधित असतो. फॉर्म्युलेशनची एक्स्ट्रुडेबिलिटी अत्याधिक कमी असल्यास उत्पादन कंटेनरमधून बाहेर काढण्यासाठी अधिक दाबाची आवश्यकता



भासू शकते, तर अत्याधिक जास्त एक्स्ट्रुडेबिलिटीमुळे फॉर्मुलेशनचे नियंत्रित प्रमाणात वितरण करणे आव्हानात्मक ठरू शकते. त्यामुळे फॉर्मुलेशन डेव्हलपमेंट आणि क्वालिटी इव्हॅल्युएशन मध्ये योग्य व पुनरुत्पादनीय एक्स्ट्रुडेबिलिटी मोजमापाला महत्त्व आहे. या नाविन्यपूर्ण रचनेचे संशोधक म्हणून खालील नावे नोंदविण्यात आली आहेत. स्वेरीच्या औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयातील डॉ. वृणाल विश्वासराव मोरे, डॉ. मिथुन गोपिकिशन मणियार, डॉ. प्राजक्ता कैलास खुळे, कु. प्रणिता पांडुरंग शिंदे तसेच संस्थेचे संस्थापक डॉ. बब्रुवाहन पांडुरंग रोंगे यांची नावे नोंदविण्यात आली आहेत. या उल्लेखनीय संशोधनाबद्दल संस्थेचे अध्यक्ष अशोक भोसले, उपाध्यक्ष सुरेश राऊत, सचिव डॉ. सुरज रोंगे, संस्थेचे इतर पदाधिकारी व विश्वस्थ, सर्व संचालक मंडळ व कॅम्पस इन्चार्ज डॉ.एम. एम. पवार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. एन. डी. मिसाळ व डी. फार्मसीचे प्राचार्य डॉ.एस. व्ही. मांडवे, लॉ कॉलेजच्या प्राचार्य डॉ. बनकर, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग पदवीच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, इतर अधिष्ठाता, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी अभिनंदन केले.

**पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३९ व्या जयंतीनिमित्त जयंती सोहळ्याचे आयोजन**

# ‘भाऊरावांच्या विचारांना विद्यार्थ्यांनी प्राधान्य द्यावे’ : कमलाकर महामुनी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : रयत शिक्षण संस्थेचे कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर (अधिकारप्रदत्त स्वायत्त) आणि यशवंत विद्यालय, पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३९ व्या जयंतीनिमित्त जयंती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. कर्मवीरांच्या शैक्षणिक विचारांचा जागर विद्यार्थ्यांमध्ये व्हावा, त्यांच्या कार्याची प्रेरणा मिळावी आणि सामाजिक समतेची मूल्ये रुजावीत, या उद्देशाने विविध उपक्रमांसह हा सोहळा उत्साहात पार पडला.





कार्यक्रमाच्या निमित्ताने कर्मवीर भित्तीपत्रक, रांगोळी स्पर्धा आणि भारतीय ज्ञान परंपरेवर आधारित मॉडेल स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. तसेच कर्मवीर विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या विद्यार्थी व प्राध्यापकांचा पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे कर्मवीर विद्याप्रबोधिनी, रयत शिक्षण संस्था, सातारा येथील कार्यकारी संचालक कमलाकर महामुनी यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक विचारांची आजच्या काळातील उपयुक्तता स्पष्ट केली. 'शिक्षण हे विद्यार्थी केंद्रित असावे आणि विद्यार्थ्यांनी ज्ञानाची निर्मिती करणारे बनावे,' हा कर्मवीरांचा विचार होता, असे त्यांनी सांगितले.

कमलाकर महामुनी पुढे म्हणाले की, ज्या ठिकाणी शासनाच्या शैक्षणिक सुविधा पोहोचल्या नव्हत्या, अशा ठिकाणी कर्मवीरांनी शाळा सुरू करून बहुजन समाजाला शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. शिक्षण व्यवस्थेतील बदल समजून घेणे आणि त्याला सामोरे जाणे आवश्यक आहे. ज्ञानरचनावादाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी स्वतः ज्ञानाची निर्मिती करावी. पालकांनीही विद्यार्थ्यांचा कल ओळखून त्यांच्या शिक्षणाबाबत निर्णय घ्यावेत, असे महामुनी यांनी सांगितले.

दुसरे प्रमुख पाहुणे वसंतनाना देशमुख यांनी रयत शिक्षण संस्थेची वाटचाल कर्मवीरांच्या आदर्शातून सुरू असल्याचे सांगितले. छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा कर्मवीरांनी पुढे नेला. या विचारांतून महाराष्ट्राच्या सामाजिक व शैक्षणिक जडणघडणीला दिशा मिळाली. रयत शिक्षण संस्थेचे विद्यार्थी आज विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करीत आहेत. कर्मवीरांच्या विचारांनी अनेक पिढ्या घडल्याचे त्यांनी नमूद केले.

प्रमुख वक्ते डॉ. प्रशांत देशमुख यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जीवनकार्याचा प्रेरणादायी आढावा घेतला. बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी कर्मवीरांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. अनेक आव्हानांना त्यांनी धैर्याने सामोरे जाऊन शिक्षणाची चळवळ उभी केली. 'कमवा आणि शिका' योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. या योजनेत त्यांनी अनेक नावीन्यपूर्ण प्रयोग केले.

कर्मवीरांच्या शैक्षणिक कार्यात लक्ष्मीबाई पाटील यांनी समर्थपणे साथ दिली. शिक्षणाच्या माध्यमातून त्यांनी जातिभेदाला आव्हान देत समानता, समता आणि माणुसकीची मूल्ये रुजविली. संत गाडगेबाबा आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. संत गाडगेबाबांनी कर्मवीरांच्या शैक्षणिक कार्याला मदत केली, असे डॉ. प्रशांत देशमुख यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव यांनी विद्यार्थी आणि शिक्षकांचा सन्मान करणे ही रयत शिक्षण संस्थेची परंपरा असल्याचे सांगितले. कर्मवीरांनी मानवकेंद्री शिक्षणाला महत्त्व दिले. आजही संस्थेतील शिक्षक विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करून कर्मवीरांचा विचार पुढे नेत आहेत. 'कमवा व शिका' योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मदत करण्याचे कार्य सुरू आहे. चांगले कार्य करताना अडचणी आल्या तरी चांगल्या माणसांची साथ घेऊन वाटचाल सुरू ठेवावी, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ. बाळासाहेब बलवंत यांनी करून दिला. पारितोषिक वाचन प्रा. डॉ. सुशील शिंदे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोहिणी बावचकर आणि प्रा. कुबेर गायकवाड यांनी केले.

यावेळी रयत शिक्षण संस्थेचे अमरजित पाटील, डॉ. राजेंद्र जाधव, गणेश पाटील, ज्योतीराम भायगुडे, माजी प्राचार्य डी. जे. साळुंखे, शिवशंकर विरपे आणि प्रा. डॉ. आनंद शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या शेवटी यशवंत विद्यालयाच्या मुख्याध्यापिका अनिता साळवे यांनी उपस्थित मान्यवर, प्राध्यापक, विद्यार्थी आणि सर्व उपस्थितांचे आभार मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# ‘एनडीडीबी’च्या मदतीने दूध संघ नफ्यात आणण्याचा प्रयत्न

## चेअरमन रणजीतसिंह शिंदे यांची पत्रकार परिषदेत माहिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्डाच्या (एनडीडीबी) मदतीने तोट्यात असलेल्या सोलापूर जिल्हा दूध संघाला नफ्यात आणण्याचा प्रयत्न केला जात आहे, अशी माहिती संघाचे चेअरमन रणजीतसिंह शिंदे यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली.

संघाची ४४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवारी घेण्यात आली. तत्पूर्वी आयोजित पत्रकार परिषदेत चेअरमन रणजीतसिंह शिंदे यांनी संघाचा लेख-ाजोखा सादर केला. ते म्हणाले की, विद्यमान संचालक मंडळ अस्तित्वात येऊन ५ वर्षांचा कालावधी झाला आहे. या संचालक मंडळाच्या कालावधीतील ही ४ थी वार्षिक सर्वसाधारण सभा आहे. गत अनेक वर्षांपासून तोट्यात असलेल्या दूध संघाला फायद्यात आणण्याचा प्रयत्न संचालकांकडून करण्यात आला आहे.



पशुखाद्य कारखाना भाडेतत्त्वावर देऊन संघास प्रतिमहिना ८ लाख ५० रुपये हजार उत्पन्न सुरू केले. यापूर्वी हा कारखाना प्रतिमहिना कर्मचारी पगार, लाईट बिल, मशिनरी मेंटेनन्स व इतर खर्चाचा विचार करता प्रतिमहिना २० लाख रुपये लाईट बिल, कर्मचारी पगार १० लाख रुपये व मेंटेनन्स व इतर खर्च ५ लाख रुपये असे एकूण ३५ लाख रुपये तोट्यात होता.

पूर्वी संघाचे संकलन दैनंदिन १७ हजार लिटर होते. संचालक मंडळाच्या २०२३-२४ या कालावधीत दैनंदिन संकलन १ लाख २५ हजार लिटरपर्यंत होते. परंतु जुन्या मशिनरी व जादा कर्मचारी, दुरुस्ती खर्च जादा यामुळे प्रतिलिटर तोट्यात वाढ झाल्याने माहे ऑगस्ट २०२४ पासून संकलन बंद केल्याने प्रतिमहिना रु. २० लाख कर्मचारी खर्च अधिक लाईट बिल २० लाख रुपये प्रतिमहिना बचत झालेली आहे. त्यामुळे २०२४-२५ व २०२५-२६ या सालात संघाचा संचित तोटा रु. १० कोटीने कमी झालेला आहे.

सन २०२३-२४ ला संघाकडे बँकांची कर्जे ४२ कोटी १७ लाख रुपये इतकी होती. ती २०२५-२६ अखेर १ कोटी ४२ लाख रुपये इतकी आहेत. विद्यमान संचालक मंडळाने ३२ कोटी ७५ लाख इतक्या रकमेची बँक कर्जे परतफेड केलेली आहेत.

सन २०२३-२४ ला संघाकडे दूध उत्पादकांची देणी ५ कोटी २० लाख रुपये होती. ती २०२५-२६ अखेर निरंक आहे. विद्यमान संचालक मंडळाने दूध उत्पादकांची २०२५-२६ अखेर ५ कोटी २० लाख देणी अदा केलेली आहेत.

सन २०२४-२५ ला संघाकडे कर्मचाऱ्यांची पगार, प्रॉव्हिडंट फंड, ग्रॅच्युइटी इत्यादीची देणी रु. ८ कोटी १ लाख होती. ती २०२५-२६ अखेर २ कोटी ९० लाख देणी आहेत. विद्यमान संचालक मंडळाने कर्मचारी देणी ५ कोटी १८ लाख रुपये अदा केलेली आहेत.सन २०२३-२४ ला संघाची दूध संस्था व इतरांकडे रु. १९ कोटी ७१ लाख इतकी येणे बाकी होती. ती २०२५-२६ अखेर रु. १२ कोटी ५२ लाख आहेत. विद्यमान संचालक मंडळाने दूध संस्था व इतरांवर कोर्ट केसेस करून ७ कोटी १९ लाख रुपये येणे बाकी वसुली केलेली आहे.

सन २०२३-२४ साली कर्मचारी संख्या १६९ इतकी होती व पगारावरील खर्च ४ कोटी ६७ लाख रुपये वार्षिक इतका होता. सन २०२५-२६ साली कर्मचारी संख्या २९ असून पग-ारावरील खर्च १ कोटी ४० लाख रुपये आहे. सध्य:स्थितीत कार्यरत कर्मचारी २९ असून पगारावर खर्च वार्षिक ३६ लाख रुपये आहे. सन २०२३-२४ च्या तुलनेत संचालक मंडळाने ३ कोटी रुपये वार्षिक पगारावरील खर्च कर्मचारी कपात करून कमी केलेला आहे.

संघाचा मागील २०१७ पा-सूनचा सततचा तोटा कमी होऊन या वर्षी संघ नफ्यामध्ये आलेला आहे. विद्यमान संचालक मंडळ अस्तित्वात येताना संघास २०२२-२३ ला ९ कोटी ८२ लाख इतका तोटा होता. आज २०२५-२६ या सालात संघ नफ्यात आला, आहे, असे रणजीतसिंह शिंदे यांनी सांगितले.

### सध्यस्थितीत संघ ना नफा ना तोटा आहे

**सन २०२३-२४ ला संघास वार्षिक इलेक्ट्रीक बिल १ कोटी ८४ लाख रुपये इतके होते. सन २०२५-२६ अखेर इलेक्ट्रीक बिल २ लाख ६१ हजार रुपये इतके आहे. विद्यमान संचालक मंडळाने शीतकरण केंद्र बंद करण्याचा निर्णय घेतल्याने १ कोटी ८१ लाख रुपये इतकी इलेक्ट्रीक बिल खर्चात बचत झालेली आहे.सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात संघास ३२ कोटी ४१ लाख रुपये इतका नफा दिसतो. हा नफा पंढरपूर व टेंभुर्णी येथील जागा विक्रीच्या व्यवहारातून झालेला आहे. हा नफा संचित तोट्यामध्ये सन २०२६-२७ ला वर्ग केला जाईल. त्यामुळे सध्य:स्थितीत संघ ना नफा ना तोटा असा आहे.**

# पडघा-बोरीवलीत रोजगार मेळाव्याला युवक-युवतींचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

पडघा-बोरीवली परिसरातील युवक-युवतींना कौशल्य विकासासह रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने पोलीस अधीक्षक कार्यालय, ठाणे ग्रामीण आणि प्रथम एज्युकेशन फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. मंगळवार, दि. २९ सप्टेंबर २०२६ रोजी नवी वस्ती, पडघा-बोरीवली येथील गुजर हॉलमध्ये हा मेळावा उत्साहात पार पडला. या उपक्रमातून युवक-युवतींना प्रशिक्षण, कौशल्य व व्यक्तिमत्त्व विकास, नोकरीसाठी मार्गदर्शन व सहाय्य, व्यवसाय मार्गदर्शन तसेच रोजगाराच्या विविध संधींबाबत माहिती देण्यात आली. अनेक युवक-युवतींनी या रोजगार मेळाव्यास आवर्जून हजेरी लावत विविध प्रशिक्षण व रोजगाराच्या संधींबाबत ३५० ते ४०० युवक ,युवतींनी माहिती घेतली. यावेळी नवी मुंबई कोकण परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक चंद्रकिशोर मीणा, ठाणे ग्रामीण पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, ठाणे ग्रामीणचे अपर पोलीस अध-ीक्षक अनमोल मित्तल, गणेशपुरी विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल झालटे तसेच प्रथम एज्युकेशन फाऊंडेशनचे कार्यक्रम समन्वयक संजय लोखंडे प्रमुख उपस्थित होते. रोजगार मेळाव्यात प्रशिक्षण व रोजगार संदर्भात

विविध स्टॉल उभारण्यात आले होते. या स्टॉलच्या माध्यमातून प्रथम एज्युकेशन फाऊंडेशनच्या समन्वयकांनी युवक-युवतींना प्रशिक्षणाचे स्वरूप, रोजगाराच्या उपलब्ध संधी तसेच आवश्यक कौशल्यांबाबत मार्गदर्शन केले. उच्चशिक्षित व अनुभवी शिक्षकांचे मार्गदर्शन, सुसज्ज पायाभूत सुविधा आणि नोकरीसाठी आवश्यक सहाय्य ही या प्रशिक्षणाची प्रमुख वैशिष्ट्ये असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. बोरीवली येथील सामाजिक कार्यकर्ते अॅड. जियाद गुजर यांच्या वतीने उपस्थित म ान्यवरांचा शाल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आले सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पडघा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक पंकज गिरी यांनी केले. रोजग-ार मेळावा यशस्वी करण्यासाठी पोलीस अधीक्षक कार्यालय, ठाणे ग्रामीण, प्रथम एज्युकेशन फाऊंडेशन आणि पडघा पो-लीस ठाण्याच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# निर्ढावलेले महसूल प्रशासन आणि हतबल झालेला शेतकरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : मौजे तरडगाव तालुका पंढरपूर जिल्हा सोलापूर या ठिकाणी गट नंबर ४६ ते ५१ क्षेत्राची म ोजणी करावी म्हणून गेली आठ वर्षांपासून पंढरपूर भूमी अभिलेख तसेच तहसीलदार सोलापूर भूमी अभिलेख यांच्याकडे म ोजणी प्रस्ताव रस्ता केस दाखल आहे. तरडगाव या ठिकाणी वन विभागाचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात आहे या भागात ४६ ते ५१ गट नंबर चे क्षेत्र एकत्रीकरणात असून त्या ठिकाणी मोजणी करून मि ळावे सातबारा सदरी नोंदी कराव्यात म्हणून कुंडलिक रंगनाथ कांबळे, व हनुमंत रंगनाथ कांबळे, नारायण एकनाथ कांबळे, संभाजी एकनाथ कांबळे, यांनी गेले सात वर्षांपूर्वी जिल्हाधिकारी सोल-ापूर तसेच भुमिअभिलेख यांच्याकडे तसेच तहसीलदार यांच्याकडे दावे दाखल आहेत सदरचा दाव्याला दिव-ाणी कोर्टाचे स्वरूप आले असून महसूल प्रशासन तारीख पे तारीख देत आहे म्हणून महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या न्यायालयात ६७५/२०२५ अन-ुसार अपील दावा सुरू आहे सदर दावा लवकर चालवून न्याय मिळावा म्हणून पंढरपूरहुन प्रत्येक महिन्याला मंत्रालयात हेलपाटे घालावी लागत आहेत गेले आणि वर्षापासून अपेक्षित शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे. न्यायासाठी हातबल झालेला शेतकरी हा जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर तहसील कार्यालय पंढरपूर तसेच मुंबई मंत्रालयात खेटे घाल-ताना दिसत आहेत तरडगाव या ठिकाणी गणेशा बाई कुंडलिक कांबळे यांचा पारंपारिक रस्ता २०० षीं अडवला आहे हा रस्ता पुणे शेतकऱ्यांच्या मालकीचा नाही तो पाटबंधारे विभागाच्या अतिरिक्त आहे. बेकायदेशीर रस्ता अडवणाऱ्या



शेतकऱ्यांवर कोणतीही कारवाई करत नाहीत या उलट दगच्या शेतकऱ्यांबरोबर वाद लावून मजा बघत आहे याम ध्ये पंढरपूर तहसीलदार पाटबंधारे विभागाला नोटीस न करता शेतकऱ्यांना नोटीस पाठवून रस्ता केसला दिवाणी न्यायालयाच्या स्वरूपामध्ये तारीख पे तारीख देऊन विलंब लावत आहे सदर रस्त्याची स्थळ पाणी पंचनामे झाली तरी देखील तूर्तास अडवलेला रस्ता खुला करून मिळत नाही त्यामुळे कुंडलिक कांबळे या शेतकऱ्यांची चारी बाजूने कोंडी झाल्यामुळे त्याला दुसऱ्याच्या बांधावरून ये जा करावी लागत आहे.

संपूर्ण हकीगत पुराव्यानेशी म ांडूनही महसूल प्रशासनाला जाग येत नाही अथवा शेतकऱ्यांची क्यू येत नाही.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात लेखी पत्र देऊनही जिल्हाधिकारी यांचा तालुका प्रशासकीय अधिकारी कोणतीही अंकुश नसल्यामुळे शेतकऱ्यांच्या प्रश्नाला केराची टोपली दाखवून शेतकऱ्यांची अवहेलना केली जात आहे.

नेहा साठी हात बंद झालेला शेतकऱ्यांना महसूल मंत्री न्याय देतील का महसूल प्रशासनावर बचत ठेवतील का? वेळेत शेतकऱ्यांच्या प्रश्नाचा निपटारा होईल का असा प्रश्न सोलापूर जिल्ह्यात उपस्थित झाला आहे.

# रणजीतसिंह मोहिते पाटील यांनी दिली भाळवणी गावात भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील भाळवणी गावातील शंकर सहकारी साखर कारखान्याच्या सभासदांच्या गाठीभेटी घेण्यासाठी कारखान्याचे चेअरमन रंजीत सिंह मोहिते पाटील यांनी पाहुणे गटात भेट दिली

यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख संभाजी राजे शिंदे, पांडुरंग सहकारी साखर कारखान्याची संचालक भगवान चौगुले, सहकार महर्षींचे संचालक विजय कदम उपसरपंच नितीन शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

गाव भेटी दरम्यान रणजीत सिंह मोहिते पाटील यांनी तेज न्यूज परिवारालाही सदिच्छा भेट दिली यावेळी त्यांनी मातोश्री कुसुम माळवदे यांच्या आरोग्याची हस्तेने विचारपूस करून आरोग्य विषयक चर्चा केली.

या भेटीबद्दल ते नीटची संपादक प्रशांत माळवादे यांनी रंजीत सिंह म ोहिते पाटील यांचे आभार मानले.



**किर्लोस्कर फेरस इंडस्ट्रीजकडून ५०० लोखंडी वृक्षसंरक्षक जाळ्यांची भेट; विविध संस्था आणि पर्यावरणप्रेमी एकवटले**

# भक्तीसागर ६५ एकर परिसरात हरित क्रांतीचा संकल्प! ५०० वृक्षांच्या संगोपनासाठी किर्लोस्कर फेरस इंडस्ट्रीजचा पुढाकार; हरित पंढरपूरच्या दिशेने नवे पाऊल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्रीक्षेत्र पंढरपूर शहर अधिक हिरवेगार, स्वच्छ आणि पर्यावरणपूरक बनविण्यासाठी भक्तीसागर ६५ एकर परिसरात ५०० वृक्षांची लागवड करण्याचा संकल्प करण्यात आला. श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीच्या पुढाकाराने आणि पंढरपूर नगरपरिषदेच्या सहकार्याने राबविण्यात आलेल्या या उपक्रम ाला किर्लोस्कर फेरस इंडस्ट्रीज लिमिटेड, सोलापूर यांनी ५०० लोखंडी वृक्षसंरक्षक जाळ्या (ट्री गार्ड) देऊन मोलाचे सहकार्य केले. विविध संस्था, प्रशासन आणि पर्यावरणप्रेमींच्या एकत्रित सहभागातून ‘हरित पंढरपूर, स्वच्छ पंढरपूर’ या संकल्पनेला बळ मिळाले आहे.






पंढरपूर ही संतांची भूमी आणि लाखो वारकऱ्यांचे श्रद्धास्थ-ान आहे. आषाढी-कार्तिकी वारीसाठी येणाऱ्या वारकऱ्यांना आणि भाविकांना भविष्यात सा-वली मिळावी, शहरातील हरित क्षेत्र वाढावे आणि पर्यावरणाचा समतोल राखला जावा, या उद-ात्त हेतूने भक्तीसागर ६५ एकर परिसरात वृक्षारोपणाचा उपक्रम राबविण्यात आला. केवळ वृक्ष लावणे नव्हे, तर त्या वृक्षांचे संरक्षण, संगोपन आणि संवर्धन करून त्यांना मोठे करणे, हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे.

या उपक्रमामध्ये श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, किर्लोस्कर फेरस इंडस्ट्रीज लिमिटेड, सोला-पूर, पंढरपूर नगरपरिषद, डतएठख कॉलेज, पंढरपूर, वृक्षदायी संस्था आणि वृक्षप्रेमी ग्रुप, पंढरपूर यांनी सहभाग घेतला. विविध संस्थांच्या एकत्रित प्रयत्नांतून पर्यावरण संवर्धनाच्या कार्याला नवी दिशा मिळाली आहे.

या कार्यक्रमास किर्लोस्कर फ ेरस इंडस्ट्रीज लिमिटेडचे उजज श्री. सी. रमेश, क्ठ विभागप्रमुख श्री. ऋषिकेश कुलकर्णी, वरिष्ठ व्यवस्थापक श्री. अमित राठोड, वरिष्ठ अधिकारी श्री. नवीन सांगा व त्यांची टीम उपस्थित होती. श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीचे विश्वस्त ह. भ. प. शिवाजी मोरे महाराज, श्री. अतुल बक्षी, श्री. विनोद साठे, श्री. मोहन हौसेकर, डतएठख संस्थेचे विश्वस्त डॉ. सूरज रोंगे, जळगावकर महाराज, श्री. प्रवीणकुमार घम, पंढरपूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी श्री. महेश रोकडे आणि श्री. स्वप्निल मोरे आदी मान्यवरांनी उपस्थिती दर्शविली.

डतएठख संस्थेचे संस्थापक व प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे, सचिव डॉ. सूरज रोंगे, कॅम्पस इन्चार्ज डॉ. मुकुंद पवार, उपप्रा-चार्य डॉ. मीनाक्षी पवार, विद्या-र्थी अधिष्ठाता डॉ. एम. एस. मठपती, प्रशिक्षण व प्लेसमेंट विभागाचे डॉ. अभिषेक एम. एस. व श्री. रविराज मधेकर, प्रथम वर्ष विभागप्रमुख व छडड कार्यक्रम अधिकारी श्री. अमोल चौंडे, एछढउ विभागप्रमुख डॉ. नीता कुलकर्णी तसेच छडड विभागातील विद्यार्थ्यांनीही या उपक्रमात सहभाग घेतला.

वृक्षप्रेमी ग्रुप, पंढरपूरचे अॅड. सुनील वाळुंजकर, श्री. सोमनाथ होरणे तसेच वृक्षदायी संस्थेचे श्री. रवी सर्वगड आणि त्यांच्या सर्व सदस्यांनी या पर्यावरणपूरक उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदविला. याशिवाय विविध संस्थांचे पदाधिकारी, सदस्य, अधिकारी, कर्मचारी आणि पर्यावरणप्रेमी नागरिकांनीही सहकार्य केले.

वृक्ष म्हणजे केवळ हिरवळ नव्हे, तर भविष्यातील पिढ्यांसाठी जीवनाचा आध-ार आहे. आज लावलेले रोप उद्या एखाद्या वारकऱ्याला सा-वली देईल, एखाद्या भाविकाला विसावा देईल आणि पंढरपूरच्या पर्यावरणाला नवे जीवन देईल. या भावनेतून वृक्षलागवड आणि वृक्षसंवर्धनाची चळवळ अधिक व्यापक करण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, किर्लोस्कर फेरस इंडस्ट्रीज लिमिटेड, पंढरपूर नगरपरिषद, डतएठख कॉलेज आणि सामाजिक संस्थांच्या संयुक्त सहकार्याने उचललेले हे पाऊल पंढरपूरला हरित, स्वच्छ आणि सुंदर बनविण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

‘वृक्ष लावा, वृक्ष जगवा वारकऱ्यांना सावली द्या आणि हरित पंढरपूर घडवा!’ हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.